संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सुखसमृद्धीचे वरदान गुढीपाडवा

**सृष्टीच्या सौजन्याला शुभेच्छांचे वरदान,**
**पाडव्याच्या शुभदिनी लाभो समृध्दी समाधान।**

**चैत्र** प्रतिपदेचा आजचा दिवस साडेतीन मुहूर्तपैकी एक मानला जातो. भारतीय संस्कृतीने मनुष्याच्या मनाची जितकी काळजी घेतली आहे तितकी जगातल्या कोणत्याही संस्कृतीने घेतली नसावी. म्हणूनच या मुहूर्ताचा आणि मनाचा खूप गहिरा संबंध येतो. अन्यथा आजच्या विज्ञान युगामध्ये कोणतीही वेळ सारखीच. असे मानणारा मोठा वर्ग पाहायला मिळतो. परंतु मनातले संकल्प सिध्दीला न्यायचे असतील तर योग्यवेळ खूप महत्त्वाची ठरते. अगदी घटिकापळे पाळण्यापासून ते मिनीट सेकंदापर्यंतच्या वेळांचे एक विशिष्ट महत्त्व भारतीय संस्कृतीने समाजमनावर जाणीवपूर्वक बिंबवले आहे. म्हणूनच या साडेतीन मुहूर्ताला नवीन संकल्पांचे शुभारंभ करण्याचा उद्देश ठेवला जातो. रोज उगवणारा सूर्य सारखाच जरी असला तरी ज्याप्रमाणे रोजची सकाळ ही नवा उत्साह घेऊन येते. त्याचप्रमाणे दरवर्षी येणारा हा साडेतीन मुहूर्ताचा पाडवा वेगळा गोडवा घेऊन येत असतो. भारतीय कालगणनेचा तो पहिला दिवस ही तर त्याची खासियत आहेच. परंतु याच काळामध्ये सुरू झालेला वसंत ऋतू आणि निसर्गाच्या अनेक वृक्षराजींवर बहरणारी कोवळी पाने त्या प्रत्येकाचा वातावरणात पसरणारा मंद सुगंध, आंब्यासारखा फळांचा राजा असलेल्या झाडाच्या मोहराने मोहित होणारे मन, कडक ऊन असूनही डोळ्याला सुखावणारी ही कोवळी हिरवी पाने नकळतपणे शुभसंकेत देणारी वाटू लागतात. कोकिळेच्या कूजनाचे मंजुळ ध्वनी एखाद्या मंगल वाद्याचीच आठवण करून देतात. निसर्गानेच सृष्टीचे अनोखे चित्र रेखाटावे आणि मनातल्या डोळ्यांनी ते मनसोक्त साठवावे अशी एक विलक्षण किमया घडते आणि म्हणूनच ती चैत्रपालवी मनमोहराचा पिसारा फुलवते आहे असेही वाटून जाते. सृष्टीचा आणि मनाचा इतका घनिष्ट संबंध ओळखून त्याला मुहूर्ताचे नाव देण्याची कल्पना सुचावी हादेखील फार मोठा दैवी योग ठरतो. वर्षाच्या पहिल्या दिवशी सुरू होणाऱ्या संकल्पांना सिध्दीचे मानसिक बळही या मुहूर्तावर प्राप्त होते. यशाची चिंता न करता केवळ प्रयत्नांना प्रत्यक्षात उतरवण्याची जिद्द या मुहूर्ताच्या माध्यमातून मिळते. स्वाभाविकपणे त्या आत्मविश्वासातून सकारात्मक मानसिकता आकाराला येते.

### सृष्टीचे मांगल्य

हेच निमित्त साधून यादिवशी दिल्या जाणाऱ्या शुभेच्छा काहीवेळेला औपचारिकपणा जरी वाटत असला तरीसुध्दा मनामधल्या मतभेदांना बाजुला ठेवावे आणि निदान त्या दिवसापुरते का होईना मोकळ्या मनाने एकमेकांचे हितचिंतन करावे. या सामूहिक इच्छाशक्तीचा एक विशेष प्रभाव वातावरणात निर्माण होतो. संपूर्ण वर्ष आनंदाचे आणि सुखाचे जावो हा विचार केवळ एक बुध्दीचा खेळ नसतो तर कुठल्या तरी आंतरिक प्रेरणेने स्फुरलेला तो एक संस्कार ठरतो. याची हजारो वर्षांची परंपरा असल्यामुळेच या गोष्टीही घडून येतात. या सर्व गोष्टींचा एकत्रितपणे विचार केला तर मनुष्याच्या मनाचे हे सुशोभन त्याला एका सत्प्रवृत्तीकडे नेणारे असते. भौतिक गोष्टींनी कितीही साजसजावट केली परंतु मनामध्ये जर मतभेदांचे द्वेषाचे किंवा मत्सराचे जळमट शिल्लक राहात असेल तर त्या आयुष्यालादेखील यशाचे खडतर मार्ग अनुभवावे लागतात. अशा या मनाला सुशोभित करून दुसऱ्यांसाठी सुखसमृध्दीचे दान मागायला लावण्याची ही परंपरा म्हणूनच इतरांपेक्षा वेगळी ठरते. संत तुकारामांनी यासाठीच मन करा रे प्रसन्न, सर्व सिध्दीचे कारण अशा शब्दात त्याचे वर्णन केले होते. म्हणूनच भारतीय संस्कृतीच्या कालगणनेतल्या नव्या वर्षाचा पहिला दिवस, सृष्टीतल्या बदलाबरोबरच मनाचा विचार करतो. स्वाभाविकपणे हे मन जितके प्रसन्न आणि खंबीर राहील तितके त्याचे संकल्प उच्च आणि उदात्त स्वरूपाचेच असतात आणि ते सिध्दीला नेण्याचीदेखील शक्ती या निमित्ताने प्राप्त होत असते. याच दिवशी प्रत्येक घरासमोर उभारली जाणारी गुढी हा केवळ एक उपचार नसतो. तर ते यशाचे आत्मविश्वासाचे तितकेच मोठे प्रतिक असते. पुराणांमध्ये या गुढीला ब्रह्मध्वज म्हटले गेले आहे. असे सांगितले जाते की याच दिवशी ब्रह्मदेवाने याच दिवशी सृष्टीची निर्मिती केली आणि त्याचा आनंद व्यक्त करण्याकरिता गुढी उभारण्याची परंपरा निर्माण झाली.

### विचारसंस्कारांची समृध्दी

ही गुढी संकल्पांचे आत्मविश्वासाचे आणि अर्थातच विजयाचेसुध्दा प्रतिक मानले जाते. या दिवशी नवीन कालगणना अस्तित्वात आली. प्रभुरामचंद्र रावणाचा पराभव करून याच दिवशी अयोध्येत परत आले त्यांच्या या आगमनाचा किंबहुना रावणावर मिळवलेल्या विजयाचा आनंद गुढ्या उभारून व्यक्त केला गेला. अर्थात वेगवेगळ्या प्रांतांमध्ये वेगवेगळ्या पध्दतीने हा सण साजरा होतो पण त्यामागची भावना मात्र सारखी असते. हजारो वर्षापासून चालत आलेली ही परंपरा अजूनही टिकून आहे कारण विज्ञानामुळे मनुष्याचे मन तृप्त होताना दिसत नाही किंवा मनाचे समाधान करण्याची ताकद विज्ञानामध्ये नाही. भौतिक सुखांची लयलूट होत असताना या परंपरांमधून मनाचे पावित्र्य वाढवण्याची संकल्पना आजच्या युगातही विशेष महत्वाची ठरते. एका काठीला नवे रेशमी वस्त्र लावले जाते. चांदीचा किंवा तांब्याचे भांडे त्यावर खोचून कडुनिंबाची कोवळी पाने त्यामध्ये रोवली जातात. त्या काठीची आणि त्या भांड्याची पूजा केली जाते. दाराला आंब्याच्या पानांचे मंगल तोरण बांधले जाते. खरे तर या सगळ्या गोष्टी प्लास्टिक किंवा इतर रेडिमेड स्वरूपात मिळू शकतात. परंतु त्या नाकारून निंबाची कोवळी पाने घरात आणली जातात. गुढीला अर्पण केली जातात. तीच कोवळी पाने आंघोळीच्या पाण्यात टाकून स्नान केले जाते. किंबहुना हीच कोवळी पाने वाटून किंवा बारीक करून गुळाबरोबर खाण्याचा प्रघात शरीराला शितलता देणारा ठरतो. अतिशय छोट्या गोष्टींमधून व्यक्ती आणि समाजाचे व्यापक हित साधणारी ही पाडवा परंपरा अशीच टिकून राहो आणि समाजाला विचारसंस्कारांचे समृध्दी देत राहो हीच त्यानिमित्ताने शुभकामना.